# खासगी भागीदारीतून 'एनआयसीयू' कार्यान्वित होणार

## गिरीश महाजन यांची माहिती

प्रतिनिधी, पुणे

राज्यातील सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये खासगी भागीदारीतून नवजात शिशू अतिदक्षता विभाग (एनआयसीयू) कार्यान्वित करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन असून त्याबाबत वैद्यकीय महाविद्यालयांना सूचना दिल्याची अशी माहिती राज्याचे वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि त्यांचे कंपनी सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) भागीदार मुकुल माधव फाउंडेशन व श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट यांनी दिलेल्या देणगीतून ससून रुग्णालयामध्ये सुरू करण्यात आलेल्या अत्याधुनिक नवजात शिशू अतिदक्षता विभागाचे (एनआयसीयू) उद्घाटन वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात महाजन बोलत होते. महापौर मुक्ता टिळक, खासदार अनिल शिरोळे, पालकमंत्री गिरीश बापट, सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे, ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. अजय चंदनवाले, वैद्यकीय अधीक्षक डॉ. अजय तावरे, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष अशोक गोडसे, मुकुल माधव फाउंडेशनच्या विश्वस्त रितू छाब्रिया, फिनोलेक्स उद्योगाचे अध्यक्ष प्रकाश छाब्रिया या वेळी उपस्थित होते.

महाजन म्हणाले, समाजातील दानशूर व्यक्तींनी आरोग्य सेवेला मदत करण्यासाठी प्राधान्य द्यावे. उद्योगांनी सामाजिक जबाबदारीचा (सीएसआर) निधी देताना शिक्षणाबरोबरच आरोग्याचाही विचार करावा. त्यातून गरजू रुग्णांना सरकारी रुग्णालयात अद्ययावत वैद्यकीय सेवा मिळेल. 'गरीब रुग्ण केंद्रबिंदू मानून ससून रुग्णालयातील डॉक्टर रुग्ण सेवा देत आहेत. हा पॅटर्न राज्यात सर्वत्र वापरला जावा,' अशी अपेक्षा बापट यांनी व्यक्त केली.

शिरोळे म्हणाले, ससून रुग्णालयाच्या कार्यपद्धतीवर टीका करताना सकारात्मक बाबी समोर आणण्याचा अभ्यागत मंडळाच्या माध्यमातून नेहमीच प्रयत्न राहिला आहे. 'मध्यमवर्गीय गरजू समाजासाठी ससून रुग्णालयाची सेवा सक्षम करणे हा या सुविधेमागील हेतू आहे.

### नवजात बालकांवर तातडीने उपचार

नवजात बालकांना विविध आजारांवर तातडीने उपचार करण्यासाठी अतिदक्षता विभागात दाखल करावे लागते..या उपचारांकरिता होणारा खर्च सर्वसामान्य जनतेच्या आवाक्याबाहेरचा असतो. त्यामुळे अत्याधुनिक सेवासुविधा सामान्य नागरिकांना उपलब्ध व्हाव्यात या हेतूने सार्वजनिक खासगी लोकसहभागातून एनआयसीयू विभाग तयार करण्यात आला आहे. या विभागात ५९ खाटा असून दुग्धपेढी, जन्मलेल्या बाळाची श्रवणक्षमता तपासण्याची यंत्रणा, कृत्रिम श्वासोच्छ्वास यंत्रणा, विभागात दाखल असलेल्या बालकांच्या मातांसाठी खास व्यवस्था केली आहे.